**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रामचंद्र आबासो रायते
मु.पो.कोडोली, ता.कराड, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा — उत्तरवादी

(१)**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा
(२)**जन माहिती अधिकारी** तथा सरव्यवस्थापक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सातारा, कोडोली शाखा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०२+९०१ / सातारा /२००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रामचंद्र आबासो रायते
मु.पो.कोडोली, ता.कराड, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा

(१)**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा डॉ.महेश कदम
(२)**जन माहिती अधिकारी** तथा सरव्यवस्थापक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा कोडोली, जि.सातारा प्रतिनिधी श्री.एस.टी.कुंभार

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.९.४.२००९ व २१.२.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३०.४.२००९ व २६.३.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२६.५.२००९ व ९.४.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३३.६.३००९ व १२.५.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

ग्रामविकास सेवा सोसायटीकडील कर्ज प्रकरणात जादा व्याज का आकारले, आपल्याकडे येणे बाकी दाखवून तेवढी रक्कम अनामत म्हणून ठेवून घेतली; याबाबत आपण केलेल्या तक्रारीची दखल घेतली नाही व जादा व्याज आकारणीबाबतचा खुलासा केला नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रामचंद्र आबासो रायते यांनी केली.

अपीलकर्त्याच्या वडिलांनी केलेल्या अर्जावर केलेल्या कारवाईच्या संदर्भात त्यांची तक्रार असून खुलाशाची मागणी केली आहे(अपील क्र.९०२). हीच माहिती त्यांनी सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडेही मागितली होती(अपील क्र.९०१). आपल्या कार्यालयाकडील माहिती त्यांना दिली. व्याज आकारणी आदीबाबत त्यांची तक्रार असल्यास संबंधित नियमावलीनुसार त्यांनी अपील करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सरव्यवस्थापक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा कोडोली, जि.सातारा यांचे प्रतिनिधी श्री.एस.टी.कुंभार यांनी केले. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला शासकीय भाग भांडवल वा शासनाकडून अन्य अर्थसहाय्य मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, अशी भूमिका बँकेने प्रथमपासून घेतली आहे. तरीही बँकेकडील माहिती त्यांना देण्यात आली. श्री.रायते यांच्या वडिलांनी मागितलेली अशाच प्रकारची माहिती कोडोली ग्रामविकास सोसायटीनेही दिली आहे, असे प्रतिपादन सरव्यवस्थापक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा कोडोली, जि.सातारा यांचे प्रतिनिधी श्री.एस.टी.कुंभार यांनी केले.

व्याज आकारणी व दाखविलेली थकबाकी योग्य की अयोग्य, अशी विचारणा श्री.रायते यांनी प्रामुख्याने केली. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ही बाब निर्णयार्थ येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २६.२.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.राजकुमार भागवत कुंभार
मु. पो. कोरफळे, ता बार्शी.
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
शिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
उपशिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९२४/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.१२.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२३.१.२००८ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती - मागणी अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दिनांक ८.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नसल्याचे निवेदन दिनांक ७.११.२००८ रोजी अपीलकर्ता श्री. आर. बी. कुंभार यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य. ), सोलापूर यांना दिले. त्या निवेदनाची प्रत अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.), सोलापूर यांनी

दिनांक १.२.२०१० च्या अहवालासोबत आयोगास सादर केली

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १८.२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री. जयराम आबाजी भोसले
शिक्षक वसाहत, मु. पो. साखरवाडी, ता.फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती फलटण, ता.फलटण, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत साखरवाडी, ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९२६ / २००९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | २०.११.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. जयराम आबाजी भोसले
शिक्षक वसाहत, मु. पो. साखरवाडी, ता.फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती फलटण, ता.फलटण, जि.सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत साखरवाडी, ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२५.३.२००९, ११.५.२००९ व २७.५.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२७.५.२००९ ६.५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.११.६.२००९ |
| ८ | मूळ माहिती अर्ज (जोडपत्र अ) ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

ग्रामपंचायतीकडून आपल्याला ठराविक स्वरूपाची व विशिष्ट नमुन्यातच माहिती हवी होती. परंतु त्यानुसार दिली नाही. अवाजवी शुल्क कळविले, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.जयराम आबाजी भोसले यांनी केली.

श्री.भोसले यांनी दि.२४.८.२००५ ते दि.१९.३.२००९ या कालावधीतील विस्तृत माहिती मागितली असून बहुसंख्य मुद्दयांबाबत विशिष्ट तक्ता दिला आहे. त्यांचा अर्ज दि.२१.३.२००९ चा असून आर्थिक वर्षाअखेरची कामे, लोकसभा निवडणूकविषयक काम, तसेच ग्रामसेवकांकडे असलेला दोन ग्रामपंचायतींचा पदभार यामुळे माहिती त्वरित देता येणार नाही, मुदतवाढ मिळावी, असे पत्र श्री.भोसले यांना दि.२५.३.२००९ रोजी पाठविले. श्री.भोसले यांनी नमूद केलेल्या तक्त्यानुसार माहिती उपलब्ध नसून या माहितीबाबतच्या ७७८५ प्रतींसाठी रू.१६०७० शुल्क भरण्याबाबत त्यांना दि.११.५.२००९ रोजी कळविले. शुल्काबाबतचे स्पष्टीकरण व मागितलेल्या माहितीत ग्रामपंचायतीचे जवळपास संपूर्ण दप्तर समाविष्ट होत असल्याचे त्यांना दि.२७.५.२००९च्या पत्रान्वये पुन्हा कळविले. त्यांनी शुल्क भरले नाही, त्यामुळे माहिती देता आलेली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत साखरवाडी, ता.फलटण, जि.सातारा श्री.रमेश चिमाजी साळुंखे यांनी केले. ते रास्त असल्याचे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथाविस्तार अधिकारी, पंचायत समिती फलटण, ता.फलटण जि.सातारा श्री.अरविंद बाबुराव आढाव यांनी केले.

अपीलकर्ता श्री.भोसले यांनी पाच वर्षांच्या कालावधीतील विस्तृत माहिती विशिष्ट नमुन्यात संकलित करून मागितली आहे. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत साखरवाडी, ता.फलटण, जि.सातारा यांनी त्याबाबत दिलेले स्पष्टीकरण योग्य आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करून नेमक्या माहितीच्या प्रती योग्य ते शुल्क भरून प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२५ .२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिनकर खाशाबा शिंदे
५५/सी, कोयना वसाहत, ता.कराड, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
कराड, ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९४५ / सातारा /२००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिनकर खाशाबा शिंदे
५५/सी, कोयना वसाहत, ता.कराड, जि.सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
कराड, ता.कराड, जि.सातारा श्री.वि.शं.दळवी

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.५.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.८.६.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.६.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.-- |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी फसवणूक केल्याची फिर्याद आपण पोलिसांकडे दिली होती. त्या संदर्भातील कागदपत्रांच्या प्रती दिल्या नाहीत. जाणीवपूर्वक टाळाटाळ करण्यात आली. अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा, जि.सातारा हे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या दबावाखाली भ्रष्टाचाराला पाठीशी घालत आहेत व अनेक कर्जदारांना त्यामुळे बराच त्रास होत आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.दिनकर खाशाबा शिंदे यांनी केले.

अपीलकर्त्याच्या मागणीनुसार शुल्क भरून माहिती घेऊन जाण्याबाबत कराड शहर पोलीस ठाण्याकडून खास कर्मचाऱ्याबरोबर पत्र पाठविले होते. परंतु दिलेल्या पत्त्यावर ते राहत नसल्यामुळे त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. त्यानंतर अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा, जि.सातारा यांच्याकडे त्यांनी अपील केले. मूळ अर्जातील चार मुद्दयांबाबत स्पष्टीकरणात्मक माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिले. त्यानुसार उत्तर देण्यात आले. माहिती नाकारलेली नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, कराड, ता.कराड, जि.सातारा श्री.वि.शं.दळवी यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, कराड, ता.कराड, जि.सातारा यांनी विहित मुदतीत उत्तर दिले आहे. तसेच अपीलकर्त्याची मूळ तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयार्थ येत नाही. प्रकरणातील संबंधितांच्या जाबजबाबाच्या नकला अपीलकर्त्यास त्वरित निःशुल्क पुरवाव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार माहिती पाठविण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस

अधिकारी, कराड, ता.कराड, जि.सातारा श्री.वि.शं.दळवी यांनी दि.२३.११.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २६.२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१.

श्री.ज्ञानचंद्र श्रीधर पाटील
'शितल' दामाणि हायस्कूलच्या पूर्वेस,
चांदणी चौक, सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपसचिव,
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, पुणे खडपीठ,
पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९५१/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७/१०/२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७/१०/२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५/११/२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२/१२/२००८ |
| ८ | **माहिती-** मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपिलकर्ता श्री.ज्ञानचंद्र श्रीधर पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन त्यांच्या मूळ माहिती-मागणी अर्जाला जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ :- पुणे
दि. 26 FEB 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.अरुण येधू शिंदे
मु.पो.पिंपळसुटी, ता.शिरुर,
जि.पुणे

अपीलकर्ता

विरुध्द

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक,
श्री वाघेश्वर विद्याधाम, मांडवगण फराटा, ता.शिरुर, जि.पुणे

उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९६४/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.४.२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३.५.२००८ |
| ४ | <u>मुळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी</u> :- दि.१२.९.२००६ व दि.२५.९.२००६ या दोन दिवसांची रजा विनावेतन केल्यासंदर्भातील कागदपत्रांची प्रती | |

## <u>विवेचन</u>

दि.२७.६.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये सदर अपिलाचा समावेश होता. काही माहिती मिळाली असून ऊर्वरीत माहिती संपूर्ण, अचूक व नि:शुल्क मिळावी, असे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले. त्यानुसार अपीलकर्त्यास माहिती देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री वाघेश्वर विद्याधाम, मांडवगण फराटा, ता.शिरुर, जि.पुणे यांनी दि.१७.१२.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**स्थळ : पुणे**
**दिनांक : 26 FEB 2010**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१.

श्री. मारुती महादेव सूर्यवंशी
महादेव स्मृती बिल्डींग,
सांगली वेस, मिरज,
जिल्हा सांगली **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** आयुक्त/सहा. संचालक,
नगर रचनाकार,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** प्रशासकीय अधिकारी,
नगररचनाकार,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | अपिल ४७६/२०१०/ सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८/४/२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४/५/२००९ व १५/६/२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि २७/८/२००९ व १५/६/२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०/१०/२००९ |
| ८ | **मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती :-** वास्तुशास्त्रज्ञ श्री.सुनिल सातपुते यांच्या आर्किटेक्ट लायसन्स संदर्भात, तसेच त्यांनी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये चालू केलेल्या बांधकामाच्या मंजुरी संदर्भातील माहिती. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.मारुती महादेव सूर्यवंशी यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती-मागणी अर्जांसाठी एकत्रित अपील केले आहे. प्रत्येक माहिती अर्जासाठी स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. सबब श्री सूर्यवंशी यांच्या या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ :- पुणे
दि. 26 FEB 2010